


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २३४ ●रविवार,दि.२३ नोव्हेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# भाजपाचा नेता ठाकरे गटात; शिंदेंचे 35 आमदार फुटणार ? फडणवीसांच्या नार्को टेस्टची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची धामधूम सुरू असताना शिवसेना ठाकरे गटाने भाजपाला मोठा धक्का दिला 'एकनाथ शिंदेंनी पेरले तेच उगवले ऑपरेशन लोटसमध्ये शिंदे गटाचे ३५ आमदार फुटणार', असा दावा शिवसेनेच्या सामना मुखपत्रातून करण्यात आला भीमशक्ती आणि शिवशक्तीची युती सत्तेसाठी नव्हे तर न्यायासाठी असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले रत्नागिरीत शिंदेसेनेचा नगराध्यक्ष निवडून जरी आला तरी पुन्हा पोट निवडणूक लागणार, असा दावा भाजपाच्या जिल्हाध्यक्षांनी केला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राचे सर्वात मोठे 'आका' असून त्यांची नार्को टेस्ट करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसकडून करण्यात आली.

### भीमशक्ती-शिवशक्तीची युती न्यायासाठी - शिंदे

भीमशक्ती आणि शिवशक्तीची युती सत्तेसाठी नव्हे तर फक्त न्यायासाठी आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. ठाण्यातील मासुंदा तलाव येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानात शुक्रवारी रिपब्लिकन सेनेच्या ११ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी रिपब्लिकन सेनेचे प्रमुख आनंदराज आंबेडकर उपस्थित होते. शिवशक्ती आणि भीमशक्ती पुन्हा एकत्र आल्या हा योगायोग नसून इतिहास घडत आहे. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला जगातले सर्वोत्तम संविधान दिले. त्या घटनेमुळे



सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीला सुद्धा सर्वोच्च स्थान मिळू शकते, असे शिंदे म्हणाले. ठाण्यात २५ वर्षांपूर्वी आनंद दिघे यांनी भीमशक्ती आणि शिवशक्तीची मुहूर्तमेढ रोवली होती. आता आमची झालेली युती ही सत्ता मिळवण्यासाठी नव्हे, तर सर्वसामान्यांच्या न्यायासाठी आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### भाजपाच्या जिल्हाध्यक्षांची शिंदे गटावर टीका

रत्नागिरीत शिंदेसेनेचा नगराध्यक्ष निवडून जरी आला तरी पुढील दोन ते अडीच ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● भाजपाचा नेता ठाकरे गटात

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची धामधूम सुरू असताना भारतीय जनता पक्षाला मोठा धक्का बसला. डोंबिवलीतील भाजपा युवा मोर्चाचे उपाध्यक्ष योगेंद्र भोईर व त्यांच्या पत्नी ट्विंकल भोईर यांनी आज शिवसेना ठाकरे गटात जाहीर प्रवेश केला. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत मुंबईतील मातोश्री या निवासस्थानी हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. योगेंद्र भोईर हे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे निकटवर्तीय मानले जातात. आगामी काळात कल्याण-डोंबिवली महापालिकेची निवडणूक होणार आहे. त्याआधीच भोईर दाम्पत्याने ठाकरे गटात प्रवेश केल्याने भाजपाला हा मोठा धक्का मानला जात आहे. या पक्षप्रवेश कार्यक्रमाच्या वेळी ठाकरे नेते विनायक राऊत, उपनेते संपर्कप्रमुख गुरुनाथ खोत, जिल्हाप्रमुख तात्यासाहेब माने, डोंबिवली शहरप्रमुख प्रकाश तेलगोटे तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.

### ● शिंदेंचे ३५ आमदार फुटणार ?

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना राज्यातील सत्ताधारी महायुतीतील वाद चव्हाट्यावर आला आहे. खासदार श्रीकांत शिंदे बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या कल्याण-डोंबिवलीत भाजपाने शिवसेना शिंदे गटाला एकापाठोपाठ एक धक्के देण्यास सुरुवात केली आहे. शहरातील शिंदे गटाचे पदाधिकारी भाजपात प्रवेश करीत आहेत. भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या भूमिकेमुळे शिंदे गटातील नेत्यांनी नाराजी व्यक्त करीत आहे. त्यातच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्याने महायुतीतील नाराजीच्या चर्चेला अधिकच बळकटी मिळाली आहे. यादरम्यान दिल्लीतील भेटीवेळी अमित शाह शिंदेंना यांना जुमानले नाही, अशी टीका ठाकरे गटाचे मुखपत्र सामनाच्या अग्रलेखातून करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टी त्यांच्या ऑपरेशन लोटस या मोहिमेअंतर्गत शिंदे ३५ आमदार फोडणार असल्याचा दावाही अग्रलेखात करण्यात आला आहे. शिंदेंनी जे पेरलंय तेच उगवतंय, असा टोलाही यावेळी लगावण्यात आला आहे.

# मुंडे भाऊ-बहिणीचा परळीच्या निवडणुकीत विजयाचा श्रीगणेशा

## धनंजय मुंडेंचे सोशल इंजिनिअरिंग आणि महायुती इफेक्ट ठरणार निर्णायक; दोन जागा बिनविरोध विजयी!



**परळी । प्रतिनिधी**

परळी नगर परिषद निवडणुकीत माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली नगर परिषद निवडणुकीच्या विजयाचा श्रीगणेशा उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या रेश्मा केशव बळवंत (प्रभाग १३- ब) व शिवसेना (शिंदे गट) च्या उमेदवार जयश्री मुंडे - गित्ते (प्रभाग ११ - अ) या बिनविरोध नगरसेवक झाल्या आहेत. राज्यात अत्यंत चर्चेत असलेल्या परळी वैद्यनाथ नगर परिषद निवडणुकीत मुंडे बंधू - भगिनी महायुती म्हणून एकत्रित लढत असल्याने त्यांचे बळ अधिक असून, निवडणुकीची सुरुवात होण्याआधीच दोन जागा बिनविरोध विजयी झाल्याने मुंडेंचा गड अबाधित राहील, याचे संकेत स्पष्ट झाले आहेत, असे म्हणणे वावगे ▶▶ उर्वरित पान २ वर

# आ.सना मलिक यांनी जिंकले बीडकरांचे मन

## रॅली व सभांना मतदारांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे घड्याळाचा गजर

### मुस्लिमांच्या समस्या सोडविण्यासाठी नप ताब्यात देऊन अजितदादांचे हात बळकट करा : आ.सना मलिक

**बीड । प्रतिनिधी**

नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या प्रचारार्थ अनुशक्ती मतदारसंघ मुंबईच्या विकसनशील आ. सना मलिक बीच्या दौऱ्यावर होत्या त्यांनी शुक्रवार आणि शनिवार असे दोन दिवस विविध सभा आणि शहरातून पायी रॅली काढून शहर अक्षरश... पिंजून काढून बीडकरांचे मन जिंकले आहे. त्यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असल्याने शहरात घड्याळाचा गजर वाढला आहे. यावेळी त्यांनी बारामती प्रमाणे बीडचा विकास करण्यासाठी आणि



मुस्लिमांचे प्रश्न सोडविण्यासाठी बीडची नगरपरिषद राष्ट्रवादीच्या ताब्यात देऊन अजितदादांचे हात बळकट करा असे आवाहन मतदारांना आ. सना मलिक यांनी केले आहे. तसेच जेंव्हा मुस्लिम अडचणीत असतात तेंव्हा अजितदादा सोबत असतात जेंव्हा कुरेशी समाज आणि शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू होते तेंव्हा ही अजितदाच सोबत होते याची आठवणही त्यांनी करून दिली. बीड नगरपरिषद निवडणुकीची जोरदार रणधुमाळी सुरू झाली

### ● आ. सना मलिक यांचा मोबाईल पळवला; पोलिसांना कळवताच चोराने लढवली शक्कल

नगर पालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी राष्ट्रवादीच्या मुंबई अनुशक्ती नगर मतदारसंघाच्या आमदार सना मलिक ह्या दोन दिवस बीड दौऱ्यावर आल्या होत्या. यात त्यांनी शुक्रवारी दिवसभर प्रचार केला आणि शनिवारी बीड मधील काही भागात प्रचार सभा घेतल्या. बीड ▶▶ उर्वरित पान २ वर

# अधिकाऱ्यांना गोठ्यातलं शेण ही पुरेना...

## हजार रुपयाची लाच घेताना अभियंता पकडला

**बीड । प्रतिनिधी**

गाय गोठ्याची फाईल करण्यासाठी गेवराई पंचायत समितीतील अभियंत्याने शेतकऱ्याकडे हजार रुपयाची लाच मागितली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या अभियंत्यास जाळ्यात पकडले. विनायक राठोड असं या लाचखोर अभियंत्याचं नाव आहे. अधिकाऱ्यांनी किती खालचा दर्जा गाठला आहे याचं उदाहरण पुढे आला आहे.विनायक राठोड या अभियंत्याने बुधवार दि. १९ नोव्हेंबर रोजी एक



हजार रुपयांच्या लाचेची मागणी त्याच्या बीड शहरातील अंबिका चौकातील एका प्रायव्हेट कार्यालयात केली होती. संबंधीत तक्रारदाराला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी बीडच्या लाचलुचपत विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची खात्री पटल्यानंतर एसीबीने त्याच्याविरोधात सापळा लावला. परंतु राठोडला संशय आल्यानंतर त्यानं तक्रारदाराला टाळायला सुरूवात केली. मात्र लाचेची मागणी केल्यावरून विनायक राठोड यास एसीबीने बेड्या ठोकल्या आहेत. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे डीवायएसपी सोपान चित्तमपल्ले यांनी शनिवारी दुपारी सव्वा एकच्या सुमारास केली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# केजमध्ये मुलीच अपहरण करून बलात्कार

**केज । प्रतिनिधी**



शहरात एक धक्कादायक प्रकार घडला असून एका अल्पवयीन मुलीला एका तरुणाने कॉफी शॉपमध्ये नेवून तिच्यावर अत्याचार केल्याची घटना घडलीय. या तरुणाने २० नोव्हेंबर रोजी मध्यरात्री एका चौदा वर्षीय मुलीचे अपहरण केले होते. यानंतर शहरातील एका कॉफी शॉपमध्ये घेवून जात तिच्यावर अत्याचार केले. दरम्यान, हा प्रकार कुटूंबीयांना समाजताच त्यांनी तातडीने केज पोलीस ठाण्यात धाव घेते घडलेला प्रकार सांगितला. तक्रारीनुसार पोलिसांनी तरुणाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान या घटनेनंतर आरोपी फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहे. तसेच या प्रकरणाचा आधी तपास केज पोलीस करत आहे. मात्र या घटनेनंतर पोलिसांनी केज शहरातील कॉफी शॉपवर कारवाईचे सत्र सुरु केले आहे.

# ऊस दरप्रश्नी माजलगाव येथे 24 रोजी चक्काजाम आंदोलन करण्याची शेतकरी संघटनांची घोषणा

**बीड । प्रतिनिधी**

माजलगाव येथील बाजार समितीत जिल्हाभरातील सर्व शेतकरी संघटनांच्या कार्यकर्त्यांची व ऊस उत्पादक शेतकऱ्यांची नुकतीच बैठक झाली. यावेळी आंदोलनातील विविध टप्प्यांचा आढावा घेण्यात आला. ऊस दरप्रश्नी सोमवारी दि. २४ रोजी माजलगाव येथे होणाऱ्या चक्काजाम आंदोलनात सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन शेतकरी संघटनांद्वारे करण्यात आले



आहे. किमान एफआरपीप्रमाणे एकरकमी उचल मिळायला हवी, अशी मागणी करण्यात येत आहे.

याबाबत शेतकरी नेते अजित नवले म्हणाले की, साखर उतारा हाच अंतिम ऊसदराचा निकष न राहाता रेव्हन्यू शेअरिंग फॉर्मुल्यानुसार साखर उताऱ्यासाठी ७०:३० व इतर उपपदार्थावर ७५:२५ हा शेतकरी व कारखानदारांचा वाटा लक्षात घेऊन उसाला किमान चार हजार रुपये अंतिम ऊस दर मिळालाच हवा. या आंदोलनात अखिल भारतीय किसान सभेचे राज्य अध्यक्ष उमेश देशमुख, शेतकरी संघटनेचे नेते कालिदास आपेट, ॲड. अजय बुरांडे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे ॲड. ढगे, युवा शेतकरी संघर्ष समितीचे अजय राऊत, जगदीश फडताळे उतरणार आहेत.

# बीडच्या विकासाचं नवं पान जनतेच्या विश्वासाने विजयाची नवी उमेद!

## आम्हाला एकदा संधी द्या या संधीचे सोनं करू : संदीप क्षीरसागर

### सर्व जातींच्या लोकांची तुतारीला साथ




*राष्ट्रवादी भवन, बीड येथे ज्येष्ठ नगरसेवक नरसिंग अण्णा नाईकवाडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षामध्ये प्रवेश केला यावेळी शैलेश नाईकवाडे यांना पक्षाच्या युवक जिल्हा उपाध्यक्ष पदावर नियुक्त केले.*

**बीड । प्रतिनिधी**

बीडमध्ये सर्व जाती-धर्माचे लोक एकोप्याने राहतात. कितीही प्रयत्न केले तरी येथील सामाजिक सलोखा बिघडला नाही, आणि बिघडणार नाही. आणि ही एकजूटच आपली ताकत आहे, असे प्रतिपादन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या कॉर्नर बैठकीत ते बोलत होते. बीड नगरपरिषदेसाठी नुकताच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवारांसाठी आ.संदीप क्षीरसागर प्रचाराला नुकतीच सुरुवात केली आहे. सुरूवातीलाच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रचाराला मतदारांमधून तुफान प्रतिसाद मिळत आहे. शुक्रवार (दि.२१) रोजी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ.स्मिताताई विष्णू वाघमारे तसेच प्रभाग क्रमांक ९ येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार शेख अथर (बब्बूभाई) , ▶▶ उर्वरित पान २ वर

# केज येथे मटका जुगाराचे साहित्य, रोख रक्कम व मोबाईल जप्त

**बीड । प्रतिनिधी**

केजचे सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम यांनी मटका जुगार आड्यावर छापेमारी केली.मटका बुक्या सुरू ठेवल्याने पोलिसांनी एकास पकडले. त्याच्याकडून मटका जुगाराचे साहित्य, नगदी रक्कम व मोबाईल जप्त केला. याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. केज शहरात व ग्रामीण भागात मटका जुगाराचे जाळे पसरविले आहे. मटका बुक्या राजरोसपणे सुरू असल्याचे ▶ उर्वरित पान २ वर



## डोंगराळे अत्याचार प्रकरण; पीडित कुटुंबास राज्य शासनाकडून 10 लाखांची मदत

मुंबई । प्रतिनिधी

डोंगराळे (ता. मालेगाव, जि. नाशिक) येथे अल्पवयीन मुलीवर झालेला अत्याचार आणि निर्घृण हत्येची घटना अत्यंत गंभीर, संतापजनक व मानवतेला काळिमा फासणारी आहे. या घटनेमुळे पीडित कुटुंबावर झालेली मानसिक, सामाजिक व भावनिक हानी अपरिमित असून, शासनामार्फत पीडित कुटुंबाला मनोधैर्य योजनेतून १० लाख रुपयांची तात्काळ मदत मंजूर करण्यात आल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

संबंधित घटनेची माहिती मिळताच प्रशासनाला कुटुंबाच्या मदतीसाठी तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना मंत्री तटकरे यांनी दिल्या होत्या. त्यानुसार या संदर्भातील प्रस्ताव जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे सादर करण्यात आला होता. जिल्हा महिला व बालविकास समितीने मनोधैर्य योजनेअंतर्गत १० लाख रुपये इतकी आर्थिक मदत पिडीत बालिकेच्या कुटुंबाला देण्याचा निर्णय घेतला.

◆ पान १ वरून पुढे...

## भाजपाचा नेता...

वर्षात नगरपालिकेची पोटनिवडणूक लागणार हे निश्चित आहे, असा दावा भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेश सावंत यांनी केला. रत्नागिरीतील निवडणुका राजकीय स्वार्थासाठी घेतल्या जात आहेत. जनतेच्या पैशाची ही उधळपट्टी का करावी. नगरपालिका निवडणुका राजकीय स्वार्थासाठी नव्हे तर या नागरिकांचे वीज, रस्ते, पाणी आदी मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी घेतल्या जातात, असा संतापही त्यांनी व्यक्त केला. राजेश सावंत यांची कन्या शिवानी सावंत-माने या ठाकरेंच्या शिवसेनेकडून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहे. त्यामुळे आजपासून आपल्या मुलीच्या प्रचारासाठी मैदानात उतरणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मुलीच्या राजकीय कारकिर्दीसाठी भाजपाच्या जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा देणा-या राजेश सावंत याचा राजीनामा रत्नागिरीत चर्चेचा विषय ठरला आहे.

काँग्रेसकडून फडणवीसांच्या नार्को टेस्टची मागणी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाती-जातीत कलह निर्माण केले आहेत. राज्यात मराठा विरुद्ध ओबीसी, धनगर विरुद्ध आदिवासी, हिंदू विरुद्ध मुस्लीम अशी भांडणे लावून द्वेष पसरवला जात आहे. फडणवीस हेच महाराष्ट्राचे सर्वात मोठे 'आका' असून त्यांची नार्को टेस्ट करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. पालिका निवडणुकांच्या निमित्ताने सपकाळ यांची आज शनिवारी (दि.२२) परभणी जिल्ह्यातील पाथरी येथे जाहीर सभा झाली. यावेळी काँग्रेसचे सर्व पदाधिकारी तसेच कार्यकर्ते उपस्थित होते. गरिबांचे मरण हेच भाजपचे धोरण आहे. भाजपच्या मंत्र्यांनी प्रचंड भ्रष्टाचार केलेला असून बंद पडलेले घड्याळ आणि उधार आणलेला धनुष्यबाण याच्या आधारे भाजपने महाराष्ट्रात सत्तेचा दुरुपयोग सुरू केला आहे असे यावेळी सपकाळ म्हणाले. त्यांनी आपल्या भाषणात सपकाळ यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली.

## मुंडे भाऊ....

ठरणार नाही. दरम्यान या निवडणुकीत पक्षीय गणितांसोबतच उमेदवारी देताना धनंजय मुंडे यांनी साधलेले सोशल इंजिनिअरिंग, त्याला मंत्री पंकजाताई मुंडे यांची साथ, शिवसेनेचे बळ या तीनही गोष्टी एकत्रित आल्याने महायुती इफेक्ट इथे निर्णायक ठरेल असे चित्र निर्माण झाले आहे. राज्यात अनेक ठिकाणी महायुतीची गणिते बिघडल्याचे चित्र आहे, मात्र तरीही धनंजय मुंडे यांच्या पुढाकारामुळे परळी नगर परिषद निवडणुकीत महायुती एकत्र जागा लढवत आहे. विशेष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या सह राष्ट्रवादी काँग्रेस २३ जागांवरती लढत असून, भाजप ८, शिवसेना २ तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांनाही दोन जागा देण्यात आल्या आहेत. धनंजय मुंडे यांनी महायुतीची घडी बसवून विजयाचा मार्क अधिक सुकर केला असल्याची चर्चा आहे.

## आ.सना मलिक...

असून, काल उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असल्याने निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. यामुळे आता प्रचाराला वेग आला आहे. कॉर्नर बैठका, रॅलीने जोर धरला आहे. तर शुक्रवारी (दि.२१) आणि शनिवारी दोन दिवस आ. सना मलिक या प्रचारासाठी बीडच्या दौऱ्यावर होत्या, यावेळी त्यांनी शहरातील विविध भागात सभा घेतल्या असून, पायी रॅली काढून शहर अक्षरश... पिंजून काढले आहे. या दोन दिवस त्यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून,त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणाने बीडकरांची मने जिंकली असल्याचे दिसून येत आहे. यामुळे शहरात नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलता पारवे आणि सर्व प्रभागातील उमेदवारांची हवा निर्माण झाली आहे. तसेच मोमीनपुरा येथील सभेत बोलताना त्यांनी अजितदादा हे कुठे ही असले तरी त्यांनी विरांशी तडजोड केली नाही. ते नेहमीच सवारना सोबत घेऊन चालण्यावर विश्वास ठेवणारे नेतृत्व असल्याचे सांगितले आहे. तसेच मुस्लिमांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी ते प्रयत्नशील असून मार्टी स्थापन करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला आहे. तर जेंव्हा कुरेशी समाजाला अडवून मारहाण करण्यात येत होती. यामुळे बाजार बंद केले होते. यामुळे शेतकरी अडचणीत आले होते. यावेळी सर्व शांत असताना अजितदादा मदतीला धावून आले. प्रत्येक समस्या सोडविण्यासाठी अजितदादा आग्रही असतात. तर जसा बारामतीचा विकास झाला तसा बीड शहराचा विकास करण्यासाठी अजितदादा यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलता पारवे आणि सर्व नगरसेवक पदाचे उमेदवार यांच्या घड्याळ या चिन्हा समोरील बटन दाबून विजयी करा असे आवाहन केले. यावेळी शेख निजाम, फारुख पटेल, शेख मुजीब, भागवत तावरे, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलता पारवे, सर्व नगरसेवक पदाचे उमेदवार आदींची उपस्थिती होती.

## ● आ. सना मलिक यांचा...

**शहरातल्या गांधी नगर भागात दाखल होत येथील प्रचार ऑफिसच्या उद्घाटन समयी आमदार सना मलिक यांचा फोन चोरीला गेल्याची घटना घडली. त्यानंतर आमदार यांचे स्वीय सहाय्यक यांनी तात्काळ सायबर विभागाला कळवले. त्यानंतर एका तासाने तो मोबाईल एका लहान मुलाच्या हाताने पोलीस ठाण्यात पाठवून दिल्याची माहिती आमदाराचे स्वीय सहायक यांनी दिली. मात्र याबाबत तक्रार दाखल झाली नसल्याने गुन्हा दाखल झाला नाही आणि पुढे तपासही नाही. एवढा ताफा एवढी तत्परता असताना चक्क आमदार सना मलिक यांच्या फोनवर डल्ला मारला जात असेल तर सर्वसामान्य नागरिकांची काय अवस्था, असे या घटनेतून स्पष्ट दिसून येते.**

## बीडच्या विकासाचं...

सौ.रेखाताई पिंगळे तसेच प्रभाग क्रमांक २१ चे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार कु.पोर्णिमा चव्हाण व विपूल गायकवाड यांच्या प्रचारार्थ शहरातील शाहूनगर आणि गांधीनगर भागात कॉर्नर बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ.संदीप क्षीरसागरांसह माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सदरील बैठकीस या भागातील हजारो मतदार उपस्थित होते. त्यामुळे या दोन्ही बैठकांना अक्षरशः सभेचे स्वरूप आले होते.

## केज येथे...

निदर्शनास येताच केजचे सहाय्यक पोलीस निरीक्षक वेंकटराम यांनी अंबाजोगाईच्या पोलिसांच्या मदतीने शहरात छापेमारीचे सत्र सुरू केले . अनेक मटका बुकी एजंटवर कारवाई करीत अनेक एजंटवर गुन्हे दाखलकरण्यात आले. त्यानंतर केज ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी ही घाडी मारल्या होत्या. त्यातून ही जनावरांच्या सरकारी दवाखाना परिसरात चालता फिरता कमिशनवर मटका जुगार घेत होता. ही माहिती मिळताच फौजदार अमिरोद्दीन इनामदार, पोलीस नाईक संतोष गित्ते यांनी छापा मारून एकास पकडले. त्याच्याकडील मटका जुगाराचे साहित्य, नगदी तीन हजार ३० रुपये व चार हजाराचा मोबाईल जप्त केला. फौजदार अमिरोद्दीन इनामदार यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास केज पोलीस ठाण्याचे पोलीस करीत आहेत.

◆ पान ४ वरून पुढे...

## पोलीस भरतीसाठी....

मो.९९२१४२७१२७, पाटोदा तालुक्यात माऊली जरांगे मो.८६९८५३७४७४,शिरूर तालुक्यात गणेश भांडेकर ९८२२७५९७५१ यांना संपर्क करावा. मूळ नोंदी असलेले विद्यार्थी तातडीने संपर्क साधू शकतील, असेही मराठवाडा भूषण लोकनेते आ.सुरेश आण्णा धस प्रतिष्ठानच्यावतीने जि. प.सदस्य माऊली जरांगे यांनी कळविले आहे.

## पालकांनी आपल्या...

गुणवत्ता वाढीविषयी पालकांशी संवाद साधला या उपक्रमांचा उद्देश शिक्षणाचा दर्जा सुधारणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर लक्ष ठेवणे आणि शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढवणे हा राहिला. बैठकीत पालकांशी विद्यालयाचे प्राचार्य भक्तराज पौळ, नरुटे सर, धोत्रे सर यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेविषयी सविस्तर चर्चा केली. यावेळी विद्यालयाचे शिक्षक भिलगुडे सर, खरात सर, बागडे सर, घारगे सर, पवार सर, उपस्थित होते. भेटीमध्ये पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता तर शाळेच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. तर पालक संवाद बैठकीच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## पिंपळनेर परिसर...

कारखान्याचा गाळप हंगाम सुरू असल्याने ऊसतोड मजुरांनाही थंडीच्या आगमनाने दिलासा मिळाला आहे. दिवसभर उन्हात काम करून संध्याकाळी येणारा गारवा अंगाला झोंबत आहे. गेल्या काही वर्षांत एवढा लांब पावसाळा झाल्यानंतर इतक्या उशिरा. हवामान खात्याने पुढील काही दिवसांत तापमान आणखी खाली जाण्याची शक्यता व्यक्त केलेली आहे.

## लंपी स्किन...

पशुपालकांना करावी. जनावरांचा मृत्यू झाल्यापासून सदरील घटनेची सर्व प्रक्रिया करून पंधरा दिवसात सदरची मदत पशुसंवर्धन विभागाच्या प्रशासनाने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी अशी विनंती शिवशक्ती भीमशक्ती विचार मंचाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांनी केली आहे. सदरील आजारामुळे महाराष्ट्रातील पशुपालक शेतकऱ्यांमध्ये सध्या भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. त्यामुळे लंपी स्किन च्या आजाराने मृत्यू झालेल्या जनावराबाबत पशुसंवर्धन विभाग जर दखल घेत नसेल तर सदरील जनावराच्या मालकांनी ९२८४७०२०१२ या दूरध्वनी नंबर वर संपर्क करावा असे आवाहन शिवशक्ती भीमशक्ती विचार मंचाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांनी केले आहे.

## ईमारत असूनही...

अंगणवाडीही चालते. शिक्षकांच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी निर्माण झाली असतानाच रस्ता अडथळ्यामुळे संपूर्ण शिक्षणप्रक्रियेलाच तडा गेला आहे. शाळेची इमारत उभी राहिल्यानंतर परिसरात मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती वाढली. काही नागरिकांनी त्यांच्या जागेभोवती तारेचे कुंपण उभारून संपूर्ण मार्गच बंद केला. परिणामी विद्यार्थी शाळा डोळ्यासमोर दिसूनही तिथपर्यंत पोहोचू शकत नाहीत. एक महिन्यापासून विद्यार्थ्यांना - लिंबाच्या झाडाखाली बसून शिकावे लागते, उघड्यावरच अल्पोपहार घ्यावा लागतो, पिण्याचे पाणी उपलब्ध नाही, स्वच्छतागृह, पंखे, विजेची सुविधा नाही, यामुळे सर्दी, खोकला अशा आरोग्य समस्या वाढण्याचा धोका पालकांनी व्यक्त केला आहे. शिक्षक-पालक त्रस्त; प्रशासनाचे मौन कायम- मुख्याध्यापक गणेश भुंबे यांनी सांगितले की, वारंवार लेखी सूचना देऊनही संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नाही. रस्ता दुरुस्तीसंबंधी कोणताही स्पष्ट निर्णय अथवा वेळापत्रक प्रशासनाने आजवर दिलेले नाही. पालक आणि ग्रामस्थांनीही या गंभीर दुर्लक्षाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

## 'जेलवारी'ची...

केविलवाणा प्रयत्न फसणार असल्याची चर्चा माजलगावच्या प्रत्येक वार्डात होताना दिसत आहे. विकास नाही, तर सहानुभूतीचं राजकारण का ? असा थेट सवाल नागरिक करीत आहेत.नगरपालिकेतील आर्थिक अनियमितता, निविदांतले संशयास्पद व्यवहार आणि प्रशासनातील बेजबाबदार कारभार यामुळे नगरपालिका अक्षरशः निळकृत केल्याची नाराजी आजही ताजी आहे. त्यातच स्वतःवरील भ्रष्टाचाराच्या प्रकरणांची धूळ अजून उठायची बाकी असताना पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून एकाच घरातील तब्बल तीन उमेदवार देऊन सर्व निर्णय अधिकार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) यांना भोवणार असल्याची चर्चा माजलगावकर आता करू लागले आहेत. मोहन जगतापांचा हा निर्णय सर्वसामान्य निष्ठावंत कार्यकर्त्यांना धक्का देणारा ठरला आहे . शहरातील अनेक वर्षांपासूनचा अतिक्रमण हटाव हा जिव्हाळ्याचा प्रश्न; मात्र चाऊस घराण्याने सत्तेत असताना या प्रश्नावर पडदा टाकून कायम मौन पाळल्याने भविष्यातही हा मुद्दा कायमच दडपला जाईल, अशी शहरवासीयांची ठाम भावना आहे. नगराध्यक्ष पद परत चाऊस घराण्यात गेलं तर अतिक्रमण हटणार तर नाहीच, असा ठाम विश्वास मतदार खुलेपणाने व्यक्त करीत आहेत. बहुजन समाजातील निष्ठावंत कार्यकर्त्यांना वंचित ठेवून एकाच घराचे लाड पुरवणाऱ्या मोहन जगतापांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी


### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (व .स्तर)**
**बीड यांचे न्यायलयात**
किरकोळ दिवाणी अर्ज क्रं. १६१० /२०२५

अर्जदार- १) बाबुराव पि.बाजीराव वरपे, वय-७६ वर्षे, धंदा-शेती, रा. कुटेवाडी ता. जि. बीड, २) तुकाराम पि.बाबुराव वरपे, वय - ५१ वर्षे, धंदा-शेती, रा. सदर

(अर्जदार हे भारतीय रहिवाशी आहेत)

विरुध्द निरंक

दावा महोदय, - कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे.

महोदय,

याकामी अर्जदारांची विनंती खालील प्रमाणे आहे.

१. हे की, अर्जदार क्रं. १ हे मयताचे पती आहेत. तसेच अर्जदार क्रं. २ हा मयताचा मुलगा आहे.मयत नामे मुक्ताबाई भ्र.बाबुराव वरपे, रा. कुटेवाडी ता.जि.बीड या दिनांक १५-०७-२०२४ रोजी कुटेवाडी ता.जि.बीड येथे मयत झालेल्या आहेत.

२) हे की, अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. मयतास सदर अर्जदार वगळता इतर कोणीही वारस नाहीत.

३) हे की, मयता बद्दल व इतर आवश्यक माहिती खालील प्रमाणे.

अ) मयताचे संपुर्ण नांव, मृत्यु दिनांक व ठिकाण- मुक्ताबाई भ्र.बाबुराव वरपे, मृत्यु दिनांक १५-०७-२०२४ ठिकाण:-कुटेवाडी ता.जि. बीड

ब) मयताचे कायमस्वरुपीचे वास्तव्याचे ठिकाण :- कुटेवाडी ता.जि.बीड

क) मयताचे नातेवाईक व त्यांचे रहिवाशी ठिकाण व मयताशी नाते संबंध-

आग्रलेखात लिहल्या प्रमाणे. अर्जदारांशिवाय मयताचे इतर कोणीही नातेवाईक नाहीत.

पुढील तारीख ०६/०१/२०२५

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

शिक्का

### जाहीर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**
किरकोळ दिवाणी अर्ज कमांक १४९७ / २०२५
CNR No. MHBI02000031812025
सुरेखा सुरेश मोरे व इतर २ वि. निरंक

अर्जदार १. सुरेखा भ्र. सुरेश मोरे, वय-५२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. रौळसगाव ता. जि. बीड, २. हर्षल पि. सुरेश मोरे, वय-२४ वर्षे, धंदा-शेती, रा. रौळसगाव ता. जि. बीड, ३. प्रियंका भ्र. चैतन्य हजारे, वय-२७ वर्षे, धंदा-घरकाम, रा. रौळसगाव ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.

वरील अर्जदार क. १ ते ३ यांनी या न्यायालयात मयत सुरेश हरिभाऊ मोरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत सुरेश हरिभाऊ मोरे यांचा दिनांक ०४/०४/२०२२ रोजी मृत्यु झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार का. २ हा मयताचा मुलगा आहे व अर्जदार क. ३ ही मयताची विवाहित मुलगी आहे. तसेच मयताची आई-वडील यापुर्वीच मयत झाले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत सुरेश हरिभाऊ मोरे यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख ०६/१२/२०२५

आज दिनांक ०५ माहे नोव्हेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

(मार्फत - ॲड. डी. एम. रोटे)

(स्वाक्षरीत) क.लिपीक

शिक्का

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

### जाहीर प्रगटन

**तहसीलदार, बीड यांचे न्यायालयात**
जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ४९६/२०२५

बाळासाहेब मोहन पवार -विरुध्द- ग्रा.पं. कार्या. खंडाळा

पहा,

१. बाळासाहेब मोहन पवार, रा. खंडाळा ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक शिवकन्या संजय माळी यांचा दिनांक १०/०९/२०१८ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास खंडाळा ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे खंडाळा ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०७/१२/२०२५ ही आहे.

शिक्का

(स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड

### जाहीर प्रगटन

**तहसीलदार, बीड यांचे न्यायालयात**
जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ४९८/२०२५

सभाकर मधुकर मेंगडे -विरुध्द- ग्रा.पं. कार्या. चऱ्हाटा

पहा,

१.सभाकर मधुकर मेंगडे, रा. मेंगडेवाडी ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक सभाकर मधुकर मेंगडे यांचा दिनांक १५/०४/१९९० रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास चऱ्हाटा ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे चऱ्हाटा ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०७/१२/२०२५ ही आहे.

शिक्का

(स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ८०९/२०२५
काशिबाई उमाजी कणसे विरुद्ध- निरंक

ज्याअर्थी मयत नामे शांताबाई लिंबाजी कदम हे दिनांक २१.०६.२०२५ रोजी दिमाखवाडी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार- १. काशिबाई उमाजी कणसे, वय ६८ वर्षे, धंदा घरकाम, रा. दिमाखवाडी ता. गेवराई जि. बीड

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार व गैरअर्जदार यांना सदर मयत नामे शांताबाई लिंबाजी कदम, रा. दिमाखवाडी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : ०३.१२.२०२५

(मार्फत ॲड. डी.एम. रोटे )

(स्वाक्षरीत) क.लिपीक

शिक्का

आदेशावरून (स्वाक्षरीत) सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर गेवराई

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७८९/२०२५
काशिबाई उमाजी कणसे वि. निरंक

ज्याअर्थी मयत लिंबाजी पि. केशव कदम, रा. दिमाखवाडी ता. गेवराई जि. बीड हे / हया दिनांक २२/०२/२०२० रोजी मौजे दिमाखवाडी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार काशिबाई भ्र. उमाजी कणसे, वय ६८ वर्षे, धंदा घरकाम रा. दिमाखवाडी ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार व गैरअर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत लिंबाजी पि. केशव कदम, रा. दिमाखवाडी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २२/०९/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- १०/१२/२०२५

(मार्फत ॲड. डी. एम. रोटे, गेवराई)

(स्वाक्षरीत) क.लिपीक

शिक्का

आदेशावरून (स्वाक्षरीत) सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर गेवराई

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस. डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**
किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १७३८/२०२५
सोजरबाई प्र. कचरु सातपुते वि. निरंक

मागणी :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदार: १. सोजरबाई भ्र. कचरु सातपुते, वय ७३ वर्षे, धंदा घरकाम, रा. नवगण राजुरी ता. जि. बीड २. बंडु पि. कचरु सातपुते, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. नवगण राजुरी ता. जि. बीड, ३. रामहरी पि. कचरु सातपुते, वय: ४४ वर्षे, धंदा शेती, रा. नवगण राजुरी ता.जि. बीड , ४. संजय पि. कचरु सातपुते, वय: ४० वर्षे, धंदा शेती, रा. नवगण राजुरी ता. जि. बीड

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे कचरु पि. हरिभाउ सातपुते, राहणार - नवगण राजुरी ता. जि. बीड हे दिनांक ११/१०/२०२५ रोजी नवगण राजुरी ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे कचरु पि. हरिभाउ सातपुते यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत कचरु पि. हरिभाउ सातपुते, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख २४/१२/२०२५ आहे.

आज दिनांक २०/११ / २०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

(मार्फत ॲड. महाजन)

(स्वाक्षरीत) क.लिपीक

शिक्का

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

### जाहीर प्रगटन

**मा. श्री आर. जी. बागडे साहेब, ६वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**
किरकोळ दिवाणी अर्ज १६०९/२०२५
पठाण नरेखा विरूध्द निरंक

अर्जदार - १. पठाण बनेखा बाबामिया, वय - ६५ वर्षे, धंदा- व्यापार, रा. कुर्ला ता.जि. बीड, ह.मु. मसरत नगर, जिजामाता चौक, बीड ता. जि. बीड, २. गणीखा पि. बाबामिया पठाण, वय ६४ वर्षे, धंदा-शेती, रा. कुर्ला ता.जि. बीड, ३. मजिद बाबामिया पठाण, वय ५६ वर्षे, धंदा - शेती रा. सदर, ४. पठाण अय्युब बाबामिया, वय ५२ वर्षे, धंदा - शेती रा. सदर , ५. सय्यद महेताबबी सय्यद अमीन, वय ७८ वर्षे, धंदा - घरकाम, रा. कामखेडा ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत रशिदाबी भ्र. बाबामिया पठाण यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत रशिदाबी भ्र. बाबामिया पठाण यांचा मृत्यु दिनांक २४/०४/२०२० रोजी झाला आहे. वरील अर्जदार क्र. १ ते ५ व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत रशिदाबी भ्र. बाबामिया पठाण यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदार क्र. १ ते ५ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार क्र. १ ते ५ यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत रशिदाबी भ्र. बाबामिया पठाण यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/११/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २९/११/२०२५ आहे

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

(स्वाक्षरीत) क.लिपीक

शिक्का


Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## जाहीर प्रगटन

### तहसीलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ४९९/२०२५

विष्णू पि. प्रभाकर तांदळे –विरुध्द– ग्रा.पं. कार्या. हिंगणी(खुर्द)

पहा,

१. विष्णू पि. प्रभाकर तांदळे, रा. हिंगणी(खुर्द) ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक वेदांत विष्णू तांदळे यांचा दिनांक १६/०२/२०१४ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास हिंगणी(खुर्द) ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे हिंगणी(खुर्द) ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०७/१२/२०२५ ही आहे.

शिक्का

(स्वाक्षरीत)
तहसिलदार, बीड

## जाहीर प्रगटन

### तहसीलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ५०२/२०२५

मझहर बाबु शेख –विरुध्द– ग्रा.पं. कार्या. कामखेडा

पहा,

१. मझहर बाबु शेख , रा.कामखेडा ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक फातीमा मझहर शेख यांचा दिनांक ०२/११/२०२१ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

